# ५ डिसेंबर, वंचितांचा गौरव दिन

## तांड्यातील नाईकांचा मुख्यमंत्री पदाची शपथ - हरिभाऊ राठोड

वसंतराव नाईक यांनी ५ डिसेंबर १९६३ रोजी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आणि जवळपास १२ वर्ष ते या पदावर कायम राहिले.या दिवसाचे औचित्य म्हणून, या वर्षी त्यांच्या जन्मगावी गहुली ता पुसद ते भक्तीधाम पोहरादेवी येथे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मोटारसायकल रॅली तथा, राज्याच्या कानाकोपऱ्यातुन येणाऱ्या मोटार गाड्याच्या ताफ्यासह ही रॅली गहुलीच्या, त्या गौरवभूमीला वंदन करून पोहरादेवी कडे रवाना होईल. भक्तीधाम येथे, दुपारी ११ वा गौरव दिन सोहळा निमित्त वसंतविचार,व्याख्यानमाला, वंचित समाजाला भेडसावीत असलेले सध्याचे प्रश्न, आरक्षण, क्रिमिलियर, स्कॉलरशिप सह वसंतराव नाईक आरक्षण पॅटर्नचाही चिंतन करण्यात येईल.

## वसंतरावजी नाईक आणि, Sub-Categorization

मला असे वाटते की, महाराष्ट्राच्या जडणघडणी मध्ये, त्यांचा लाखमोलाचा वाटा होता. अनेक योजना आणि, नवनवीन कायदे त्यांच्या काळात झाले, परंतु त्यांना देवतुल्य मानावे, असे जे काम त्यांच्या हातून घडले ते म्हणजे बंजारा, विमुक्त भटक्या समाजाला वेगळे आरक्षण दिलेछ. वंचीतासाठी आश्रम शाळा काढून, त्यांना शिक्षण दिले, त्यांना स्कॉलरशिप देऊन, शिक्षण घेण्या इतपत आधार दिला, आणि म्हणून ते आठवणीत राहिले, देवतुल्य म्हणून आज त्यांची ख्याती आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीतही, तुलनात्मक अभ्यास केला तर,असे दिसून येईल की, या देशाचे संविधान त्यांनी लिहले, गोरगरीबान साठी अनेक कायदे त्यांनी पास केले, मजूर वर्ग, स्त्रिया, बालके, सगळ्यांची त्यांनी काळजी वाहली, आणि हा देश घडविला, त्यांनी दिलेल्या साविधानावर हा देश एकसंघ, ताठर मानेनी आज उभा आहे, जगातील सगळ्यात मोठी लोकशाही आपल्या देशात गुण्यागोविंदाने नांदत आहे, असे जरी असले तरी, बाबासाहेब आंबेकरांना देवतुल्य मानावे, अशा त्यांनी केलेल्या एखाद्या कार्याची जर आपण आपल्या, मेंदूच्या मेमरीला विचारले तर, असे समोर येईल की, बाबासाहेब आंबेडकरांनी अनु-जाती, अनु-जमाती, ओबीसी साठी घटनेमध्ये आरक्षणाची तरतूद केली आणि, या आरक्षणामुळे, करोडो -करोडो लोकांना सामाजिक न्याय मिळाला. त्यांच्या साठी वेगळे बजेट, आणि विविध कल्याणकारी योजना निर्माण झाल्या, आणि शिक्षण आणि नोकरी मध्ये आरक्षण देऊन, करोडो वंचितांना, समान संधी उपलब्ध करून देण्यात आली, हे सर्व काही त्या आरक्षणाच्या भोवती फिरतांना दिसते. एकूणच काय वसंतरावजी नाईक साहेब असो, पेरियार रामास्वामी असो, महात्मा ज्योतिबा फुले असो, आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज असो, एल.आर नाईक सारखे, दूरदृष्टीने मंडल आयोगामध्ये डिसेंट नोट लिहणारे विद्वान नेते असो, अशा या विद्वान नेत्याच्या कर्तृत्वामुळे, समाजाच्या पिढ्यान पिढ्याचा उद्धार होत असतो, आणि म्हणूनच वसंतरावजी नाईक यांच्या दूरदृष्टीकोण, आज महाराष्ट्रातील तमाम, बंजारा आणि भटक्या विमुक्तांच्या विकासातील मैलाचा दगड ठरला आहे.

**वसंतरावजी नाईकांनी एस.टी चे आरक्षण बंजारा आणि धनगर समाजाला का दिले नाही ?**

वसंतरावजी नाईक यांना बंजारा आणि धनगर समाजाला एस.टी चे आरक्षण देता आले नाही, हे आरक्षण देणे त्याही वेळेस अशक्यकोटीतील होते, आणि म्हणूनच नाईक साहेबांनी पर्यायी आरक्षण देऊन ओबीसी मधील Sub-Categorization करून भटक्या विमुक्तांना वेगळे आरक्षण दिले.

मी सुद्धा वर उल्लेखित सर्व महान नेत्यांचा च आरक्षणा विषयीचा दृष्टीकोन छ त्याचा अभ्यास करून संपूर्ण देशातील केवळ, बंजारा नव्हे, तर भटके विमुक्त, बारा बलुतेदार, अशा वंचित लोकांना, न्याय मिळवून देण्यासाठी २० वर्षा पूर्वी, जो लढा उभारला होता, त्याला यश आले आहे, माझ्या स्वप्नांची पूर्ती होतांना दिसत आहे. खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि वसंतरावजी नाईक यांचं अधुर राहिलेलं काम, आपण सगळे मिळून करायचे आहे.

मा.पंतप्रधान मोदीजी आणि मा.राष्ट्रपती श्रीमान रामनाथ कोविंदजी यांनी जस्टीस जी.रोहिणी यांच्या नेतृत्वाखाली आयोग नेमून २७% आरक्षणाचे विभाजन करण्याचे निर्देश दिले आहे. जवळपास दोन महिने पूर्ण होऊन एक महिना उरला आहे, परंतु दुर्दव्य असे की, ज्या ६० करोड जनतेला याचा फायदा, मिळणार आहे, ते मात्र अनभिज्ञ आहेत, या कडे फारसे कोणाचे लक्ष नाही, कुणीही बघायला तयार नाही, माझ्या कुवतीप्रमाणे मी खालील प्रमाणे विभाजन सुचविले आहे.

**१) विमुक्त जमाती २) भटक्या जमाती ३) अर्ध भटक्या जमाती ४) पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या जाती (बारा बलुतेदार) ५) अल्पसंख्याक मागासलेल्या जाती ६) अत्यंत मागासलेल्या जाती (SBC, आणि अठरा पगड ) ७) मागासलेल्या जाती (उरलेल्या इतर मागासलेल्या जाती )**

वरील प्रमाणे ज्यादिवशी केंद्र सरकारचा निर्णय अंमलात येईल त्या नंतर माझा दावा आहे की बंजारा समाजाचे तसेच, बारा बलुतेदार, अठरा पगड जातींचे आणि तेली, माळी, कोळी समाजाचे २५-२५ मुले, दरवर्षी IAS, IPS बनतील आणि राष्ट्रीयीकृत बँका, रेल्वे, पोस्ट ऑफिस , LIC इत्यादि, या कार्यालयाअंतर्गत हजारोंनी क्लास वन, क्लास टू बँक मॅनेजर बनतील. जर ओबीसी मधील १५ % बॅकलॉग मा.मोदीजी साहेबांनी भरायचे आदेश दिले तर, भटक्या आणि बंजारा समाजाचा एकही ग्रॅज्युएट, विना नोकरी राहणार नाही, हा माझा दावा आहे. विषय समजणाऱ्यासाठी आणि, जागे असणाऱ्या माझ्या समाजबांधवासाठी चांगला आहे, परंतु ज्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे, त्यांना काय सांगावे ?

वसंतरावजी साहेबांची जयंती साजरी करणे, त्यांचा गौरव दिवस साजरा करणे, त्यांच्या उद्देशाची, उद्देशपूर्ती करावयाची असेल तर, नाईक साहेबांनी जे आरक्षणचे जे स्वप्न अधुरे राहिले आहे, ते पूर्ण करण्यासाठी समाज बांधवांनी या विषयी गहन विचार करावा आणि वसंतराव नाईक आरक्षण पॅटर्न, देशभर लागू होणार आहे, आणि त्याची अंबलबजावनी होई पर्यंत मागणी रेटावी असे वाटते.

**आपला,**

**मा.संपादक,**
**वरील लेख आपल्या लोकप्रिय दैनिकातून "गौरव दिनानिम्मित"५ डिसेंबर रोजी प्रकाशित करावा हि विनंती.**

**हरिभाऊ राठोड**
**आमदार**